नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, परभणी भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmparbhani@yahoo.com

लातुर कृषि हवामान सल्ला शुक्रवार, दिनांक – ११.०९.२०२०

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक १२ ते १६ सप्टेंबर, २०२०)				
दिनांक	१२/०९	१३/०९	१४/०९	१५/०९	१६/०९
पाऊस (मिमी)	१५.०	०८.०	१५.०	३३.०	३०.०
कमाल तापमान (अं.से.)	३४.०	३४.०	३३.०	३१.०	३३.०
किमान तापमान (अं.से.)	२३.०	२२.०	२२.०	२२.०	२३.०
ढग स्थिती (आकाश)	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	९३	९०	९३	९३	९३
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	६२	६७	६८	७५	७४
वा-याचा वेग (किमी / तास)	१२	१४	१५	०९	१३
वा-याची दिशा	नैऋत्य	पश्चिम	पश्चिम	वायव्य	पश्चिम

हवामानाचा इशारा	लातुर जिल्हयात पुढील पाच दिवसात आकाश ढगाळ राहील. जिल्हयात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. जिल्हयात दिनांक ११ सप्टेंबर रोजी तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटाची शक्यता आहे. दिनांक १३, १४ आणि १५ सप्टेंबर २०२० रोजी जिल्हयात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे.	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
सोयाबीन	शेंगा भरणे अवस्था	मराठवाडयात ढगाळ वातावरण, आर्द्रता व पावसामूळे उशिरा पेरणी केलेल्या सोयाबीन पिकावर शेंगा करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे याच्या व्यवस्थापनासाठी टेब्युकोनॅझोल १०% + सल्फर ६५% (संयुक्त बुरशीनाशक) ५०० ग्रॅम किंवा टेब्युकोनॅझोल २५.९% २५० मिली प्रती एकर पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. आवश्यकता वाटल्यास दहा दिवसांनी परत एकदा फवारणी करावी. उशिरा पेरणी केलेल्या सोयाबीन पिकावरील तंबाखूवरील पाने खाणारी अळी व उंट अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी इंडोक्झाकार्ब १५.८% ७ मिली किंवा फल्युबेन्डामाईड ३९.३५% ३ मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट १.९% ९ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी.
खरीप ज्वारी	दाणे भरणे अवस्था	खरीप ज्वारी पिकावरील कणसातील अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी किंवा मॅलाथिऑन ५% भुकटी प्रती हेक्टरी २० किलो प्रमाणे धुरळणी करावी किंवा मॅलाथिऑन ५०% १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी.
बाजरी	-	
ऊस	वाढीची अवस्था	ऊस पिकावर रसशोषन करणा-या किडींचा (पांढरी माशी, पाकोळी) प्रादुर्भाव दिसून येत आहे याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २०% ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी.
हळद	कंद वाढीची अवस्था	हळद पिकात कंदमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे याच्या व्यवस्थापनासाठी १५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५ % २० मि.ली. किंवा डायमिथोएट ३० % १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून चांगल्या दर्जाचे स्टिकरसह पावसाने उघाड दिल्यास आलटुन-पालटून

		फवारणी करावी, उघडे पडेलेले कंद मातीने झाकून घ्यावेत. (हळद पिकावर केंद्रीय किटकनाशक मंडळातर्फे लेबल क्लेम नसल्यामुळे विदयापीठ शिफारशीत संशोधनाचे निष्कर्ष दिले आहेत). हळद पिकात मॅग्नेशियम सल्फेटची कमतरता दिसून येत आहे. याच्या व्यवस्थापनासाठी ०.२% (२० ग्रॅम प्रती१० लिटर पाणी) मॅग्नेशियम सल्फेटची पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी.
संत्रा /मोसंबी	फळवाढीची अवस्था	लिंबुवर्गीय पिकांत कोळी किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे याच्या व्यवस्थापनासाठी डायकोफॉल १८.५% २ मिली किंवा प्रोपरगाईट २०% १ मिली किंवा इथिऑन २०% २ मिली किंवा विद्राव्य गंधक ३ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. आवश्यकता असल्यास दुसरी फवारणी १५ दिवसांच्या अंतराने करावी. संत्रा / मोसंबी फळबागेत रसशोषन करणारे पतंग यांच्या व्यवस्थापनासाठी खाली पडलेली फळे गोळा करून नष्ट करावीत. सायंकाळी बागेत कडूनिंबाचा पाला व शेणाच्या गौ-या यांचा धुर करावा तसेच विषारी अमिष (१०० मिली फळाचा रस + १०० ग्रॅम गुळ + १०० मिली मेलॅथीऑन किटकनाशक व ९०० मिली पाणी मिसळून) पसरट तोंडाच्या डब्ब्यामध्ये टाकून बागेमध्ये लटकून ठेवावेत. तसेच फोरेट १०% १० ग्रॅम सुती कपडयामध्ये पुडी बांधून प्रत्येक झाडावर लावावेत. पंधरा दिवासच्या अंतराने पिशव्या बदलाव्यात. मृगबहार संत्रा मोसंबी फळबागेत फळवाढीसाठी ००:००:५० १५ ग्रॅम प्रती लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी.
डाळिंब	फळ वाढीची अवस्था	सध्याचे ढगाळ वातावरण, आर्द्रता व पावसामुळे डाळिंब फळपिकात तेल्या रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. याच्या व्यवस्थापनासाठी रोगनाशकाची फवारणी करावी. डाळिंब बागेत १% बोरडॅक्स मिश्रणाची फवारणी करावी. बागेतील फुटवे काढावे.
चिकू	वाढीची अवस्था	चिकु बागेतील तणांचे व्यवस्थापन करावे.
फुल शेती	वाढीची/काढणी अवस्था	फुलपिकात तणांचे व्यवस्थापन करावे व काढणीस तयार असलेल्या फुलांची काढणी टप्याटप्याने करावी व प्रतवारी करून बाजारपेठेत पाठवावी.
भाजीपाला	वाढीची/काढणी अवस्था	भेंडी पिकावरील फळपोखरणारी अळीचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५% २.५ मिली किंवा फेनप्रोपॅथ्रीन १५% + पायरीप्रॉक्झीफेन ५% १० मिली किंवा क्विनॉलफॉस २५% २० मिली प्रती १० लिटर पाण्यात पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. भाजीपाला पिकातील तणांचे व्यवस्थापन करावे व काढणीस तयार असलेल्या भाजीपाला पिकांची काढणी टप्याटप्याने करावी व प्रतवारी करून बाजारपेठेत पाठवावी.
चारा पिके	वाढीची अवस्था	चारा पिकातील तणांचे व्यवस्थापन करावे.
तुती रेशीम उदयोग	--	तुती लागवड केल्यानंतर तीन महिन्याने रेशीमकिटक संगोपन करता येते. पहिल्या वर्षात २ पिके तर दुस-या वर्षापासून ५ ते ६ पिके प्रती वर्षी निघतात. एक एकर तुती बागेपासून वर्षात प्रती पीक २५० अंडीपूज ते ३०० अंडीपूज प्रमाणे २ क्विंटल / पीक रेशीम कोषाचे उत्पादन मिळते. रूपये २५० ते ३०० प्रती किलो भाव मिळाला तरी एकरी ६ पिकाचे रूपये ३ लाखापेक्षा जास्त उत्पन्न मिळते.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.